पालघर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत ८
पंचायत समित्यांच्या निवडणूका-२०२०
प्रभाग रचना व आरक्षण सोडत कार्यक्रम

सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक :- रानिआ/जिपपंस-२०१९/प्र.क्र.२३/का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १ नोव्हेंबर, २०१९

प्रति,

१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग
२) जिल्हाधिकारी, पालघर

विषय :- पालघर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत ८ पंचायत समित्यांच्या
सार्वत्रिक निवडणूका-२०२०
प्रभाग रचना व आरक्षण सोडत कार्यक्रम

संदर्भ :- १) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/जिपपंस/२०११/प्र.क्र.१२/का.७, दिनांक २९/०९/२०११
२) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०११/प्र.क्र.१४/का.७, दि.०४/१०/२०११ व दि.११/०६/२०१४
३) राज्य निवडणूक आयोगाची समक्रमांकाची दिनांक ०१ नोव्हेंबर, २०१९ रोजीची अधिसूचना

महोदय,

पालघर जिल्हा परिषदेची व त्याअंतर्गत ८ पंचायत समित्यांची मुदत अनुक्रमे दिनांक १७/०२/२०२० व दिनांक १५/०२/२०२० रोजी संपत असल्याने तत्पूर्वी त्यांच्या सार्वत्रिक निवडणूका घेणे बंधनकारक आहे.

२. राज्यातील धुळे, नंदूरबार, अकोला, वाशिम व नागपूर या ५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये आरक्षणाची टक्केवारी ५० टक्क्यापेक्षा जास्त होत असल्यासंदर्भात मा. उच्च न्यायालय, नागपूर व औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका दाखल झाल्या होत्या व सदर याचिकांत मा. उच्च न्यायालयाने जिल्हा परिषद / पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक

निवडणूका घेण्याच्या संदर्भात स्थगिती दिली होती. दरम्यान मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या विशेष अनुमती याचिका क्र.३३९०४-३३९१०/२०१७ मधील सुनावणीत उपरोक्त ५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूका न झाल्याचे व जुन्याच समित्या अस्तित्वात असल्याचे निर्दशनास आल्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.२८/०८/२०१९ रोजीच्या आदेशान्वये शासनाने नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाची लोकसंख्या सदर आदेशाच्या दिनांकापासून दोन महिन्याच्या आत आयोगास उपलब्ध करुन न दिल्यास पूर्वीच्याच तरतुदीनुसार करण्यात आलेल्या आरक्षणाच्याआधारे निवडणूका घेण्याचे आदेशित केले. राज्य शासनाने नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या लोकसंख्येची कोणतीही आकडेवारी विहीत कालावधीत उपलब्ध करुन न दिल्यामुळे संविधानातील तरतुदीनुसार जिल्हा परिषद / पंचायत समित्यांची मुदत संपण्यापूर्वी निवडणूका घेण्याच्या अनुषंगाने निवडणुकीसाठी पुढील कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. उपरोक्त ५ जिल्हा परिषदांच्यासंदर्भातील असलेली वस्तुस्थिती ही पालघर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत ८ पंचायत समित्यांनाही लागू होत असून सद्यस्थितीमध्ये त्यांची मुदत संपण्यापूर्वी निवडणूक घेण्याकरिता त्यांच्या प्रभाग रचनेची कार्यवाही, शासनाने यासंदर्भात दि.३० जुलै, २०१९ रोजी प्रख्याप्रित केलेला आदेश रद्द होण्याची वाट न पाहाता करणे क्रमप्राप्त आहे.

३. जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडून प्राप्त सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत जिल्हा परिषद क्षेत्रातील ग्रामीण लोकसंख्येनुसार राज्य निवडणूक आयोगाने दिनांक ०१/११/२०१९ च्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ९(१) नुसार जिल्हा परिषदेकरिता देय असलेली एकूण सदस्य संख्या निश्चित केली आहे. सदर अधिसूचनेची प्रत सोबत जोडली आहे.

(३.१) अधिसूचनेत नमूद केल्याप्रमाणे जिल्हा परिषदेस देय असलेल्या एकूण सदस्य संख्येची पंचायत समिती क्षेत्रनिहाय विभागणी करणे, आरक्षण ठरविणे, पंचायत समितीस देय असलेल्या जागा व त्यांचे आरक्षण निश्चित करणे ही जिल्हाधिकारी यांची जबाबदारी आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयास उपलब्ध माहितीच्याआधारे जिल्हा परिषद व पंचायत समितीस अनुज्ञेय

ठरत असलेल्या सदस्य संख्येबाबतचा तपशील (आरक्षित प्रवर्गाच्या जागांसह) तयार करण्यात आला असून तो प्रपत्र-१ व प्रपत्र-२ मध्ये नमूद करण्यात आलेला आहे. सदरचे प्रपत्र-१ व प्रपत्र-२ हे केवळ उदाहरण म्हणून सोबत जोडण्यात येत आहे. मात्र वर नमूद केल्याप्रमाणे यासंदर्भात संपूर्ण जबाबदारी जिल्हाधिकारी यांचीच असल्याने सदरची आकडेवारी काळजीपूर्वक तपासून आवश्यक असल्यास त्यामध्ये योग्य ते फेरबदल, राज्य निवडणूक आयोगाच्या निर्दशनास आणून देण्यात यावेत.

४. आता या पत्राद्वारे मुदत संपणाऱ्या पालघर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत ८ पंचायत समितीसाठी प्रभाग रचना व आरक्षण निश्चिती करण्याबाबतचे वेळापत्रक सोबतच्या प्रपत्र-३ मध्ये देण्यात येत आहे. प्रभाग रचना, आरक्षण सोडतीबाबतचे अधिकार जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांना राज्य निवडणूक आयोगाकडून संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये प्रदान करण्यात आले आहेत.

५. प्रभाग रचना करण्याचे मुख्य टप्पे खालीलप्रमाणे आहेत :-

(i) जिल्हाधिकारी यांनी प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव (अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता आरक्षित प्रभागासह) तयार करणे व विभागीय आयुक्त यांना सादर करणे.

(ii) विभागीय आयुक्त यांनी प्रारुप प्रभाग रचनेस (आरक्षणासह) मान्यता देणे.

(iii) जिल्हाधिकारी यांनी नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील /सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांसह) आरक्षणाची सोडत काढणे.

(iv) सोडतीनंतर प्रारुप प्रभाग रचना (आरक्षणासह) राजपत्रात इ.प्रसिध्द करणे.

(v) जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर विभागीय आयुक्त यांनी सुनावणी देणे

(iv) विभागीय आयुक्त यांनी अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे व त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना राजपत्रात इ.प्रसिध्दी देणे.

६. तरी प्रभाग रचना करताना जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

**(६.१) प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव (अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता आरक्षित प्रभागासह) तयार करणे व विभागीय आयुक्त यांना सादर करणे :-**

(i) महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या (जागांच्या आरक्षणाची पध्दत व चक्रानुक्रम) नियम, १९९६ मधील तरतुदीनुसार व राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-रानिआ-२०११/प्र.क्र.१४/का-७, दिनांक ४/१०/२०११ व दिनांक ११/६/२०१४ (प्रत संलग्न) अन्वये जिल्हाधिकारी यांनी निवडणूक विभाग व निर्वाचक गण यांची अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या आरक्षणासह प्रारुप प्रभाग रचना करावी व त्याचे प्रारुप विहित मुदतीत विभागीय आयुक्त यांना सादर करावेत. आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याच्या प्रयोजनार्थ सन २0२0 ची दुसरी निवडणूक आहे. त्यामुळे सन २०१५ मध्ये असलेले आरक्षण विचारात घेऊन या निवडणुकीमध्ये आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे आवश्यक आहे.

(ii) उपरोक्त दि.०४/१०/२०११ च्या आदेशात नमूद परिच्छेद २(६-अ) बाबत स्पष्ट करण्यात येते की, अपवादात्मक परिस्थितीत एखाद्या निवडणूक विभाग/निर्वाचक गणाची लोकसंख्या १० टक्क्यापेक्षा कमी किंवा जास्त होत असल्यास जिल्हाधिकाऱ्यांनी त्याबाबत समर्थनीय कारणे नमूद करून प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव विभागीय आयुक्त यांना सादर करावा. विभागीय आयुक्त यांनी जिल्हाधिकारी यांनी दिलेली कारणे संयुक्तिक आहेत किंवा नाहीत, हे तपासून प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता देण्यासंदर्भात त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा.

**(६.२) जिल्हाधिकारी यांनी सादर केलेल्या प्रारुप प्रभाग रचनेच्या (अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता आरक्षित प्रभागासह) प्रस्तावांना विभागीय आयुक्तांनी विहित मुदतीत मान्यता द्यावी..**

**(६.३) नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला आरक्षणाची सोडत -:**

प्रारूप प्रभाग रचनेस विभागीय आयुक्त यांचेकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर उपरोक्त परिच्छेद ६.१ (i) मधील नमूद नियम व आदेशानुसार नागरिकाचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला

(अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांसह) यांच्या आरक्षणाची सोडत काढण्याबाबतची जिल्हाधिकारी यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :-:

अ) जिल्हा परिषदांच्या बाबतीत जिल्हा स्तरावर ही सोडत जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली तसेच पंचायत समित्यांच्या बाबतीत तालुक्याच्या मुख्यालयी, संबंधित तहसिलदारांकडून काढण्यात यावी.

ब) तालुका मुख्यालयात काढण्यात येणाऱ्या सोडतीवर देखरेख ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी प्रत्येक पंचायत समित्यांकरिता एक उपजिल्हाधिकारी यांची नेमणूक करावी.

क) निवडणूक विभाग, निर्वाचक गणांच्या हद्दी दर्शविणारा नकाशामध्ये विभाग व गण यांचे क्रमांक व त्यांच्या चतु:सीमा स्पष्ट कराव्यात व हा नकाशा सोडतीसाठी येणाऱ्या नागरिकांना सहज दिसेल अशा ठिकाणी लावावा.

ड) सोडतीसाठी पारदर्शक ड्रम/ ाचेचा बॉक्स वापरावा व त्यामध्ये टाकावयाच्या चिठ्ठयांचा आकार १५ x १५ से.मी. पेक्षा जास्त नसावा. त्यावर लावण्यात येणारे रबर बॅण्ड एकाच रंगाचे असावेत.

इ) सोडतीसंबंधीच्या सूचनेस जिल्हास्तर व तालुकास्तरावर नेमून दिलेल्या दिनांकास मोठया प्रमाणात प्रसिध्दी दयावी. उदा.

(a) जिल्हाधिकारी, तहसिलदार, जिल्हा परिषद व पंचायत समिती कार्यालयातील नोटीस बोर्ड
(b) जिल्हा कार्यालय / जिल्हा परिषदेची वेबसाईट
(c) जिल्हयातील जास्त वाचकवर्ग असलेल्या वर्तमानपत्रात
(d) केबल टि.व्हि व इतर माध्यमे, इत्यादी.

**(६.४) सोडतीनंतर प्रारुप प्रभाग रचना (आरक्षणासह) प्रसिध्द करणे.**

(i) नगर परिषदा/नगरपंचायतीच्या बाबतीत "महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील तरतुदीनुसार सर्व आरक्षण नमूद करुनच प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात येते. त्याच धर्तीवर जिल्हा परिषद/पंचायत

समित्यांमध्ये देखील सोडतीमध्ये आलेले आरक्षण नमूद करूनच प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात येते. राज्य निवडणूक आयोगाकडून राबविण्यात येत असलेली कार्यपध्दती योग्य असल्याचे मुंबई उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्र. ३६४८/२००८ मध्ये दिलेल्या निर्णयात नमूद केलेले आहे. सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये समानपध्दतीचा अवलंब करणे आवश्यक असल्याने, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिलांसह) यांच्याकरिता प्रभाग आरक्षित करूनच प्रारुप प्रभाग रचनेची अधिसूचना प्रसिध्द करावी.

(ii) प्रारुप प्रभाग रचनेच्या अधिसूचनेस व त्यावर हरकती व सूचना स्वीकारण्याचा कालावधी व स्वीकारण्यास सक्षम असलेले प्राधिकारी यांचा तपशील यास व्यापक प्रसिध्दी द्यावी. (उदा. वृत्तपत्रे, जिल्हाधिकारी तसेच तहसिल कार्यालयाचे नोटीस बोर्ड, वेब साईट, इत्यादी)

**(६.५) प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी देणे-:**

(i) जिल्हा परिषद, पंचायत समिती प्रारुप प्रभाग रचनेवर विहित मुदतीत प्राप्त हरकती जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांनी संकलित करुन त्या विभागीय आयुक्तांना सादर कराव्यात.

(ii) प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त हरकतींवर विभागीय आयुक्त यांनी स्वत: सविस्तर सुनावणी द्यावी. असे करीत असताना जास्तीत जास्त पारदर्शकता राखली जाईल याची काळजी घ्यावी. निकाली काढण्यात येणाऱ्या हरकतींबाबतही, संबंधितांना कायद्यातील तरतुदी, भौगोलिक रचना, बदलांची आवश्यकता/अनावश्यकता यांच्या आधारे योग्य तो खुलासा करावा, जेणेकरून न्यायप्रविष्ठ प्रकरणे कमी होतील. मात्र, हरकतदारांना लेखी उत्तर देण्याची आवश्यकता नाही.

(iii) सुनावणीनंतर विभागीय आयुक्त यांनी निवडणूक विभाग/निर्वाचक गणाची प्रभाग रचना व आरक्षण अंतिम करावे.

(६.६) **अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे व प्रसिध्द करणे-**

विभागीय आयुक्त यांनी निवडणूक विभाग/निर्वाचक गणाची प्रभाग रचना व आरक्षण अंतिम केल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी त्यासंबंधीची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करावी व सदर अधिसूचनेस व्यापक प्रसिध्दी द्यावी. (उदा. वृत्तपत्रे, जिल्हाधिकारी तसेच तहसिल कार्यालयाचे नोटीस बोर्ड, वेबसाईट, इत्यादी) तसेच अंतिम प्रभाग रचनेच्या राजपत्रात प्रसिध्द झालेल्या अधिसूचनेंच्या दोन प्रती राज्य निवडणूक आयोगास पाठविण्यात याव्यात.

७. **सर्वसाधारण**

या आदेशासंदर्भात कोणतीही अडचण अथवा शंका असल्यास यासंदर्भात खुलासा करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाचे असतील.

८. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची प्रभाग रचना अंतिमरित्या प्रसिध्द होईपर्यंत सर्व टप्प्यांवरील माहिती (विहित नमुन्यात) आयोगाच्या कार्यालयास ई-मेलद्वारे sec.mh@gov.in वर वेळच्यावेळी पाठविण्यात यावी.

मा राज्य.निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:- प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, बांधकाम इमारत, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-१

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/जिपपंस-२०१९/प्र.क्र.२३/का-७,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १ नोव्हेंबर, २०१९.

## अधिसूचना

क्रमांक- रानिआ/जिपपंस-२०१९/प्र.क्र.२३/का-७- महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) (यानंतर याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा केला आहे) चे कलम ९ च्या उप कलम (१) मधील तरतुदीनुसार आणि यापूर्वीचे सर्व आदेश अधिक्रमित करून, राज्य निवडणूक आयोग, सन २०११ च्या जनगणनेच्या लोकसंख्येच्या आधारे, खालील तक्त्यातील रकाना क्रमांक-२ मध्ये नमूद करण्यात आलेल्या जिल्हा परिषदेच्याबाबतीत त्या जिल्हा परिषदेच्या नावासमोर रकाना क्रमांक-३ मध्ये नमूद केलेल्या संख्येइतकी सदस्य संख्या आगामी निवडणुकीकरिता निश्चित करीत आहे. उक्त अधिनियमाच्या कलम ५८(१) अ नुसार जिल्हा परिषदेचा प्रत्येक निवडणूक विभाग दोन निर्वाचक गणांमध्ये विभागण्यात येईल.

अनुसूची

जिल्हयानुसार जिल्हा परिषदेस देय होणारी सदस्य संख्या दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | जिल्हा परिषद | निश्चित केलेली एकूण सदस्य संख्या |
|---|---|---|
| १. | २. | ३. |
| १. | पालघर | ५७ |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

C:\Users\Anagha.bhoraokar\Desktop\महानगरपालिका निवडणुका 2020.docx

## प्रपत्र - १

### पालघर जिल्हा परिषदेत अनुज्ञेय ठरत असलेल्या निवडणूक विभागांच्या संख्येबाबतचा तपशील

| SR. NO. | DISTRICT | TOTAL POPULATION AS PER CENSUS 2011 | RATIO 114819 (DECIMAL) | CENSUS POPULATION 2011 | | | Z.P. SEATS | TOTAL WOMAN | DETAILS REGARDING RESERVATION | | | | | | | | P.S. SEATS |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | TOTAL | SC | ST | | | GEN | | SC | | ST | | BCC | | |
| | | | | | | | | | T | W | T | W | T | W | T | W | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 1 | PALGHAR | 1570084 | 7.24 | 1570084 | 27165 | 1005694 | 57 | 29 | 4 | 2 | 1 | 0 | 37 | 19 | 15 | 8 | 114 |

### जिल्हा परिषद सदस्य संख्या निश्चित करण्याचे सूत्र

"क्ष" म्हणजे राज्याच्या जिल्हयातील सर्वात जास्त लोकसंख्या (अहमदनगर - 3608932 )

"य" म्हणजे राज्याच्या जिल्हयातील सर्वात कमी लोकसंख्या (सिंधुदुर्ग - 738447 )

नियमातील सुत्रानुसार = $\frac{(\text{क्ष} - \text{य})}{25} = \frac{(3608932 - 738447)}{25} = \frac{(2870485)}{25} = 114819$

## प्रपत्र - २

### पालघर जिल्हा परिषदेतील अनुज्ञेय जागांचा पंचायत समिती क्षेत्रनिहाय तपशिल तसेच पंचायत समित्यांना अनुज्ञेय ठरत असलेल्या जागांचा तपशील

| SR. NO. | DISTRICT | PANCHAYAT SAMITI | CENSUS POPULATION 2011 | | | DECIMAL | ADMISSIBLE SEATS | | TOTAL WOMEN | Reservation | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | TOTAL | SC | ST | | ZP | PS | | GEN | | SC | | ST | | BCC | |
| | | | | | | | | | | T | W | T | W | T | W | T | W |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 1 | PALGHAR | TALASARI (SA) | 136096 | 1690 | 127275 | 4.941 | 5 | 10 | 5 | 1 | 0 | 0 | 0 | 9 | 5 | 0 | 0 |
| 2 | | DAHANU (SA) | 351808 | 4042 | 268581 | 12.772 | 13 | 26 | 13 | 4 | 2 | 0 | 0 | 20 | 10 | 2 | 1 |
| 3 | | VIKRAMGAD (SA) | 129285 | 168 | 121005 | 4.694 | 5 | 10 | 5 | 1 | 0 | 0 | 0 | 9 | 5 | 0 | 0 |
| 4 | | JAWHAR (SA) | 128147 | 516 | 124259 | **4.652** | **4** | 8 | 4 | 0 | 0 | 0 | 0 | 8 | 4 | 0 | 0 |
| 5 | | MOKHADA (SA) | 73180 | 1447 | 69164 | 2.657 | 3 | 6 | 3 | 0 | 0 | 0 | 0 | 6 | 3 | 0 | 0 |
| 6 | | WADA (SA) | 161620 | 3657 | 97288 | 5.867 | 6 | 12 | 6 | 4 | 1 | 0 | 0 | 7 | 4 | 1 | 1 |
| 7 | | PALGHAR | 481236 | 13580 | 158432 | 17.471 | 17 | 34 | 17 | 13 | 6 | 1 | 0 | 11 | 6 | 9 | 5 |
| 8 | | VASAI | 108712 | 2065 | 39690 | 3.947 | 4 | 8 | 4 | 3 | 1 | 0 | 0 | 3 | 2 | 2 | 1 |
| | | **TOTAL** | **1570084** | **27165** | **1005694** | **57.00** | **57** | **114** | **57** | **26** | **10** | **1** | **0** | **73** | **39** | **14** | **8** |

पालघर जिल्हा परिषदेस एकूण ५७ इतकी सदस्य संख्या अनुज्ञेय ठरत आहे. त्यामुळे लोकसंख्येच्या प्रमाणानुसार जव्हार पंचायत समिती क्षेत्रासाठी जरी ४.६५ एवढी सदस्य संख्या अनुज्ञेय होत असली तरी जिल्हा परिषदेची एकूण सदस्य संख्या ५७ एवढी मर्यादित ठेवणे आवश्यक असल्याने जव्हार पंचायत समिती क्षेत्रास ४ जिल्हा परिषद निवडणूक विभाग नेमून देण्यात आले आहेत.

पालघर जिल्हा परिषदेमध्ये मागील निवडणुकीप्रमाणेच यावेळीही अनुसुचित जातीसाठी एकच पद आरक्षित होत असून यापूर्वीच्या निवडणुकीमध्ये अनुसूचित जाती(स्त्री) या प्रवर्गासाठी आरक्षित होते. त्यामुळे आता सदर जागा अनुसूचित जातीसाठी आरक्षित होईल.

वाडा पंचायत समितीमध्ये मागील निवडणुकीप्रमाणेच यावेळीही नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग या प्रवर्गाकरिता १ जागा आरक्षित होत असून मागील निवडणुकीमध्ये सदर जागा नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग या प्रवर्गासाठी आरक्षित होती. त्यामुळे आता सदर जागा नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री) या प्रवर्गासाठी आरक्षित होईल.

पालघर पंचायत समितीमध्ये मागील निवडणुकीप्रमाणेच यावेळीही अनुसूचित जाती या प्रवर्गाकरिता १ जागा आरक्षित होत असून मागील निवडणुकीमध्ये सदर जागा अनुसूचित जाती (स्त्री) या प्रवर्गासाठी आरक्षित होती. त्यामुळे आता सदर जागा अनुसूचित जाती या प्रवर्गासाठी आरक्षित होईल.

**सह सचिव,**
राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ/जिपपंस/प्र.क्र.२३ /का.७, दि १ नोव्हेंबर, २०१९ सोबतचे प्रपत्र)

प्रपत्र-३

## पालघर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत ८ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता प्रभाग रचना व आरक्षण सोडतीचा कार्यक्रम

| अ.क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे | टप्पा सुरु करण्याचा / संपविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | **अ) प्रारुप प्रभाग रचना आरक्षणासह** | | |
| १. | **प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव (अनुसूचित जाती/ अनुसूचित जमातीकरिता आरक्षणासह) विभागीय आयुक्त यांच्याकडे सादर करणे** (जिल्हा परिषद क्षेत्राची निवडणूक विभागामध्ये व पंचायत समिती क्षेत्राची निर्वाचक गणामध्ये विभागणी करून ) | जिल्हाधिकारी | ११/११/२०१९ पर्यंत |
| २. | प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता देणे | विभागीय आयुक्त | १५/११/२०१९ पर्यंत |
| ३. | **आरक्षण सोडतीची सूचना वृत्तपत्रात प्रसिध्द करणे** {नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील / सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांसह) बाबत } | जिल्हाधिकारी | १८/११/२०१९ |
| ४. | **आरक्षणाची सोडत काढणे** {नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील / सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांसह) बाबत } | | |
| | अ) जिल्हा परिषद निवडणूक विभागासाठी | जिल्हाधिकारी | २०/११/२०१९ |
| | ब) पंचायत समिती निर्वाचक गणासाठी | तहसिलदार | |
| ५. | **प्रारुप प्रभाग रचनेची अधिसूचना प्रसिध्द करणे** (निवडणूक विभाग / निर्वाचक गण रचना व आरक्षणासह) | जिल्हाधिकारी | २२/११/२०१९ |
| | **ब) हरकती व सूचना तसेच सुनावणी** | | |
| ६. | जिल्हाधिकारी यांच्याकडे हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी | | २२/११/२०१९ ते ३०/११/२०१९ पर्यंत |
| ७ | प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी देऊन निवडणूक विभाग /निर्वाचक गण रचना अंतिम करणे | विभागीय आयुक्त | ०५/१२/२०१९ पर्यंत |
| | **क) अंतिम प्रभाग रचना** | | |
| ८. | अंतिम प्रभाग रचना व आरक्षण शासन राजपत्रात प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | ०७/१२/२०१९ पर्यंत |

**टिप विभागीय -:आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील नोडल ऑफीसर यांनी प्रत्येक टप्प्यावरील कामकाजाबाबत आयोगास अहवाल सादर करावा.**

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र